**GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD.**

**इयत्ता - १० वी अ,ब,क. PRELIMINARY EXAMINATION मार्क - ८०**

**दिनांक :६ जानेवारी २०२६. विषय : मराठी वेळ - २ १/२ तास**

**INSTRUCTIONS – 1. This paper comprises of two sections. Section A & B.**

**2. Section 'A' answers must be written on the answer Sheet.**

**3. Section 'B' answers must be written on worksheetItself.**

---

## विभाग " अ " गुण ४०

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:**

शाळा आणि शिक्षक असा विषय निघाला, की मला माझी मुंबईतील शाळा आणि शालेयजीवनातील शिक्षकांची आठवण येते. गिरगावातील युनियन हायस्कूल आणि माझ्या शाळकरी वयात आपुलकीनं संस्कार करणारे भावे सर, जोशी सर, शिर्के सर या साऱ्यांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहेत, पण त्याचवेळी हेही सांगितलं पाहिजे, की या शाळेशी आणि या संस्कारदेणाऱ्या शिक्षकांशी माझा जो संपर्क आला, तो जिच्यामुळे आला ती माझी परमप्रिय आई आणि माझे मामा यांचे ऋण मी कसे व्यक्त करणार? आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते. माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर माझे सर्वस्व होती

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहत होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचे वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईनं धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची कामं ती करत होती. त्यातच माशेलहून मुबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती.माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मला अनवाणीच राहावं लागलं.

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्याची वेळ आली त्यावेळी तर आणखी एक मोठं संकट समोर आलं. त्यावेळची हायस्कूलची प्रवेश फी एकवीस रुपये होती; पण आमच्याजवळ एवढे पैसे कुठून येणार? प्रवेश फी भरणे शक्य नसल्यामुळे आता माझे शिक्षण थांबणार असे वाटू लागले; पण माझ्या आईने धीर सोडला नाही. आजूबाजूच्या बिऱ्हाडातील काही कामे करून तिने पैसे जमवण्यास सुरुवात केली. त्याच वेळी तिच्या परिचयातील एक माऊली मदतीला धावली आणि माझ्या प्रवेश फीची व्यवस्था झाली; पण तोपर्यंत गिरगावातील त्यावेळच्या नामांकित शाळांमधले प्रवेश बंद झाले होते.अखेर युनियन हायस्कूलमध्ये मला प्रवेश मिळाला आणि माध्यमिक शिक्षणाचा पुढील टप्पा सुरू झाला. अनेक अडीअडचणीमधून मी जमेल तेवढा अभ्यास करत होतोच; पण त्या छोट्याशा खोलीतील जागा अपुरी पडायची.

अभ्यासाला पूरक वातावरण नव्हते. मात्र त्याही वातावरणात मी जिद्दीने अभ्यास करत राहिलो आणि परीक्षेत चांगलं यश मिळत गेलं. या युनियन हायस्कूलमधले शिक्षक, त्यांची सेवाभावी वृत्ती, विद्यार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये त्यांचे स्वतःला झोकून देणे आणि निरपेक्ष भावनेने केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या केवळ शालेय अभ्यासाचाच पाया पक्का झाला असं नाही, तर आयुष्याचाच पाया पक्का झाला. शिक्षणाबद्दल एक आंतरिक ओढ वाटू लागली.

आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. आमचं हायस्कूलही गरीब होतं, त्यामुळे उत्तरपत्रिका घरून न्यावी लागायची. त्यावेळी तिची किंमत फक्त तीन पैसे असायची, आपल्याला कदाचित पटणार नाही; पण तेव्हा दर आठवड्याला हे तीन पैसे उभे करताना देखील माझ्या आईच्या डोळ्यांत पाणी उभं राहायचं. आजही हे आठवलं, की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले. पडेल ते काम केले. काँग्रेस हाऊसजवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यानं एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत; पण त्यावेळी तिला सांगण्यात आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं, की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या

जगात मान नाही.तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच, माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट मी कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र जमवायची आणि त्याच्या वह्या करून ठेवायची. अखंड पेन्सिल मला मिळणं अवघड होतं. त्यामुळे जेमतेम हातात धरता येईलं अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

**कृती१. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा:** **गुण ४**

१. लेखकाचे वडील कितव्या वर्षी वारले?

२. लेखकाचे मूळ गाव कोणते?

३. लेखकावर कोणकोणत्या शिक्षकांचे ऋण आहेत असे ते म्हणतात?

४. लेखकाच्या हायस्कूलमध्ये चाचणी परीक्षा कधी घेण्यात येत असे?

**कृती २.खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा:** **गुण ६**

१. " मी माझ्या मुलाला शिकवीन " असे लेखकाच्या आईने का ठरवले?

२. " यामुळे माझ्या केवळ शालेय अभ्यासाचाच पाया पक्का झाला असं नाही, तर आयुष्याचाच पाया पक्का झाला." असे लेखक का म्हणतात?

३. लेखकाच्या मनात अधूनमधून कोणत्या आठवणी मनात वाऱ्यासारख्या येत राहतात?

**कृती ३. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा:** **गुण २**

१. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी ---------------- आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला.

२. त्यामुळे जेमतेम हातात धरता येईलं अशा ---------------- लिहावं लागे.

३. ---------------- परिस्थिती पूर्णपणे खालावलेली.

४. त्याच वेळी तिच्या ---------------- एक माऊली मदतीला धावली.

**प्रश्न २. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा: ( कोणतेही ६)** **गुण ६**

१. निरंजन भडसावळे गुरुजींचा लाडका विद्यार्थी का होता?

२. बाळाला वाचवण्यासाठी कोण धावून येते?

३. निरंजनच्या घरी कोणकोणती मोठी माणसे आली होती?

४.बार्क म्हणजे काय?

५. अभिषेककडे सुमित कोणत्या ठिकाणावरून आला होता?

६.आपल्या पावलांचा काळा रंग कशावरून ठरतो?

७.डॉ. होमी भाभा हे व्यक्तिमत्व कसे होते?

८. पावडेकाका रोज किती किलोमीटर कारने प्रवास करत होते?

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा. ( कोणतेही १ )** **गुण ५**

१. तुमच्या शाळेत (in your school) उन्हाळी सुट्टीत ( in summer vacation) 'व्यक्तिमत्व विकास शिबिर' (personality development camp) हे पाच दिवसाचे शिबिर आयोजित (organised camp in your school) केले आहे. त्यात तुम्हाला सहभागी ( to Participate) करून घेण्याची विनंती (request letter) करणारे पत्र तुमच्या वर्गशिक्षकांना (to your class teacher) लिहा.

(or)

२. तुमच्या धाकट्या भावास (to your younger brother) नियमित व्यायाम व अभ्यासाचे महत्व ( importance of regular exercise and study) समजावून देणारे पत्रलिहा.

**प्रश्न ४.. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:**

**"नेताजी सुभाषचंद्र बोस एक महान देशभक्त"**

२०जानेवारी १९४४ चादिवस रंगून येथे नेताजीनी भारतचा स्वातंत्र्यदिन साजरा केला.जंगी सभा झाली. दूरवरून हजारो लोक त्या सभेला आले होते. सभा सुरुहोण्यापूर्वीनेताजींनाअनेकांनी हार घातले. सभेतील त्यांच्यास्फूर्तिदायक भाषणाने तरुण भारावून गेले. भारतीय स्वातंत्र्याचा जयजयकार सुरू झाला.

एकदा नेताजी सभेत श्रोत्यांना म्हणाले, " तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा।" आणि काय आश्चर्य ! हजारो युवकांचे हात वर झाले. नेताजींनासमाधानवाटले,पण एवढ्यावर ते थांबले नाहीत ते म्हणाले, " नुसते हात वर करून चालायचंनाही. प्रत्येकाने प्रतिज्ञापत्रावर स्वतःच्या रक्ताने सहया केल्या पाहीजेत." युवकांनी आपल्या रक्ताने प्रतिज्ञा पत्रावर सहया केल्या. नेताजीच्या जयजयकारानी सभा दणाणून गेली.

भाषण संपताच नेताजींनी एक हार आपल्या हातात घेतला आणि म्हणाले बोला काय मोल दयाल तुम्ही याचं? सवाल आणि बोली सुरु झाली. सभेला आलेल्या एका युवकांचे डोळे हारावर खिळले होते. पडेल ती किंमत देऊन तो हार घ्यायचाच असे त्याने ठरवले.

बोली वाढू लागली. क्षणात तो युवक उठला आणि म्हणाला , " माझी सर्व संपत्ति या हारासाठी मी अर्पण करतो. सुभाषबाबू म्हणाले, " असं करू नको. आपल्या उपजीविकेसाठी तरी काही राखून ठेव." यावर तो उद्गारला," नाही नाही नेताजी, मी स्वतः आझाद हिंद सेनेत दाखल होणार आहे तेव्हा माझ्यासाठी वेगळं काय राखून ठेवायचं."

आझाद हिंद सेनेने स्वतंत्र भारताचे सरकार स्थापन केले होते. त्याच्या पहिल्यावाढदिवशी महिलांनी नेताजींची दागिन्यांनी तुला करण्याचे ठरवले. यात मिळणारी सर्व संपत्ति स्वातंत्र्यलढ्यासाठी उपयोगी पडणार होती. एक मोठा तराजू फुलांनी सजवण्यात आला. स्त्रीयांनी नेताजींना ओवाळले. नेताजी एका पारड्यात बसले. जमलेल्या स्त्रीया आपल्या अंगावरील दागिने काढून दुसऱ्या पारड्यात टाकू लागल्या. इंग्रजांशी लढता लढता आपला पती मरण पावला म्हणून एक तरूण स्त्रीने आपले मंगळसूत्र त्या पाड्यात टाकले. थोडया वेळाने दोन्ही पारडी सारखी होऊ लागली. पण दागिने ठेवलेल्या पारड्याचे वजन अजूनही थोडे कमी भरत होते.

इतक्यात नवलच घडले. एक वृद्ध स्त्री पुढे आली. तिच्या हातात एक सोन्याची फ्रेम होती. त्या फ्रेममध्ये एका तरूणाचा फोटो होता. हा फोटो तिने प्राणपेक्षाही अधिक जपला होता. एकवार तिने तो फोटो हदयाशी धरला. क्षणभर डोळे मिटले आणि फोटो पारड्यात टाकला. वजन पुरेपूर भरले. त्या वृध्द स्त्रीच्या डोळयांतून आनंदाश्रू वाहू लागले, कारण पूर्वी नेताजींनी हाक दिल्यावर याच स्त्रीने आपला एकुलता एक मुलगा नेताजींच्या सेनेत पाठवला होता. याच मुलांचा फोटो असलेली फ्रेम आज ती घेऊन आली होती. ती फ्रेम पाहून नेताजींचे हदय भरून आले. ते म्हणाले, " माताजी, तुम्ही धन्य आहात. ज्या देशातल्या स्त्रिया असा सर्वस्वाचा त्याग करतात, तो देश स्वतंत्र होणारच!"

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा:** **गुण ४.**

१. नेताजींनी भारताचा स्वातंत्र्यदिन कोणत्या दिवशी साजरा केला?

२. युवकांनी रक्ताने कशावर सहया केल्या?

३. आझाद हिंद सेनेने काय स्थापन केले?

४. एकदा नेताजी सभेत श्रोत्यांना काय म्हणाले?

**कृती २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **गुण ४**

१. सभेत आलेल्या युवकाला कोणी व काय समजावले ?
२. वृद्ध स्त्रीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू का वाहू लागले ?

**कृती ३.कोण कोणास म्हणाले ते लिहा.** गुण २

१. "तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूँगा!"

२. "माझी सर्व संपत्ती या हारासाठी मी अर्पण करतो."

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा : ( कोणतेही १ ) गुण ७**

१. माझा आवडता सण : ( My favourite festival )

मुद्दे : ( आवडता सण कोणता आहे - तो सण तुम्हाला का आवडतो - त्या सणाचे नाव काय आहे - सण म्हणजे धमाल आणि मौज मजा - नवीन कपडे - खूप खाणे पिणे सण म्हणजे आनंदी आनंद )

२. आमची शाळेची सहल : ( Our school picnic )

मुद्दे : ( माझ्या शाळेचे नाव - शाळेने सहल कोठे नेली होती - सहलीच्या ठिकाणी कशाने गेलो - किती वाजता निघालो - किती वाजता पोहचलात - बसमध्ये काय काय मजा केली - जेवण कसे होते - सहलीच्या ठिकाणी केलेली धमाल -किती वाजता घरी पोहचलात - सहलीचा गोड अनुभव )

३. मी माझ्या देशाचा नागरिक : ( I am a citizen of my country )

मुद्दे : ( देशप्रेम - राष्ट्रीयत्व - देशाच्या चांगल्या कामात सहभाग - हक्क आणि कर्तव्य पुस्तकातील प्रतिज्ञा )

-------------- THE END ----------------

## GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD.

इयत्ता - १० वी अ,ब,क. PRELIMINARY EXAMINATION मार्क - ४०

दिनांक : ६ जानेवारी २०२६ विषय : मराठी वेळ - २ १/२ तास

**INSTRUCTIONS – 1. Section 'B' answers must be written on worksheet Itself.**

**NAME:** ------------------------------------------ **DIV:** ---------------------- **ROLL NO:** ---------------

**विभाग " ब " गुण ४०**

**प्रश्न १.(अ). खालील दिलेल्या अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द लिहून वाक्ये पुन्हा लिहा: गुण ४,**

**( सोबती , सोबटी , विस्मय , विसमाय , तन , संपत्ती , संपत्ति )**

१. साधना परीक्षेत पहिल्या क्रमांकाने पास झाली याचे समीरला आशचर्य वाटले.

उत्तर: --------------------------------------------------------------------------------

२. आपले सुदृढ शरीर हेच आपले सुंदर आयुष्य आहे.

उत्तर: --------------------------------------------------------------------------------

३. जीवनात आपल्या सोबत चांगला मित्र असणे आवश्यक आहे.

उत्तर: --------------------------------------------------------------------------------

४. आपण जीवनात फक्त द्रव्य न मिळविता चांगले सद्गुणही मिळविले पाहिजेत.

उत्तर: --------------------------------------------------------------------------------

**प्रश्न १.(ब). खालील दिलेल्या अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्ये पुन्हा लिहा: गुण ४**

१. प्रकाशने आपल्या मेहनतीने नवीन घर बांधले.

उत्तर: --------------------------------------------------------------------------------

२. संदीप चांगल्या कामासाठी पात्र आहे.

उत्तर: --------------------------------------------------------------------------------

३. प्रशांतला अभ्यासाचे व कष्ट करण्याचे ज्ञान आहे.

P.T.O.

उत्तर: ------------------------------------------------------------

४. आशिषने चांगल्या कामासाठी <u>आरंभ</u> केला.

उत्तर: ------------------------------------------------------------

**प्रश्न १.(क) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **गुण ४**

( जीवनदायी , हितोपदेश , अकल्पित , शिस्तप्रिय , कर्णफुले , धार्मिक , नवनिर्मिती , शब्दकोश )

१. शिस्तीची आवड असणारा :------------------------------

२. धर्म पाळणारा : ------------------------------

३. कानात घालावयाची फुले : ------------------------------

४. नवीन निर्माण करणे : ------------------------------

५. हितासाठी चांगला उपदेश : ------------------------------

६. अनेक शब्दांचे अर्थ एकत्र असणारा :--------------------

७. एखाद्याला जीवन देणारी : ------------------------------

८. कल्पना नसताना अचानक घडलेली घटना : --------------------

**प्रश्न २. (अ). खालील वाक्यातील नाम व प्रकार ओळखा :** **गुण २**

( सामान्य नाम , विशेष नाम , भाववाचक नाम )

१. गोदावरीला महाराष्ट्राची गंगा म्हणतात.

उत्तर: नाम : -------------------- प्रकार : --------------------

२. एकता ही देशाची खरी ताकत असते.

उत्तर: नाम : -------------------- प्रकार : --------------------

**प्रश्न २.(ब) खालील वाक्यातील विशेषण व प्रकार ओळखा.** **गुण २**

( गुणवाचक , संख्यावाचक , सार्वनामिक )

१. मला मंदिरासमोर कुरूप माणूस दिसला.

उत्तर: विशेषण : ------------------------------ प्रकार : ------------------------------------

२. माझी बहीण पाचवी इयत्तेत शिकते.

उत्तर: विशेषण : ------------------------------ प्रकार : ------------------------------------

**प्रश्न २.(क). वाक्यांचे प्रकार ओळखा : ( विधानार्थी, प्रशनार्थी, उद्‌गारथी, आज्ञार्थी )** **गुण २**

१. किती अवाक झाली सारी जनता !

उत्तर : ---------------------------------------------

२. विवेकानंदाच्या पाठोपाठ चालत जा.

उत्तर : ---------------------------------------------

३. रमेश धापा टाकीत धावत आला.

उत्तर : ---------------------------------------------

४. हा निबंध कुणी लिहिला ?

उत्तर : ---------------------------------------------

**प्रश्न ३. ( अ) खालील विरामचिन्ह ओळखून त्यांच्या जोड्या जुळवा.** **गुण २**

| अ. क्र | " अ " गट | उत्तरे | " ब " |
|---|---|---|---|
| १. | ( ? ) | | अर्धविराम |
| २. | ( " " ) | | प्रश्नचिन्ह |
| ३. | ( ! ) | | दुहेरी अवतरण चिन्ह |
| ४. | ( ; ) | | उद्‌गारचिन्ह |

**प्रश्न ३. (ब) अचूक शब्द ओळखा :** **गुण ३**

१. शिक्षक / शिक्षाक / शिक्षहक / शीशक : ------------------------------------

२. कारबन / कार्बन / कारबण / कुरबन : ------------------------------

३. नांगरीक / नागरीक / नागरिक / नारीक : ------------------------------

**प्रश्न ३. (क). खालील दिलेल्या शब्दापासून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.** **गुण २**

१. मार्गदर्शन ( guidance ):------------------------------------------------------------

२. सकाळ ( morning ):------------------------------------------------------------

**प्रश्न ४.(अ). रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण ६**

१. निरंजन आज भल्या पहाटेस उठून ------------------------------ बसला होता.

( खेळायला , पोहायला , अभ्यासाला )

२. तर मुलांनो , जवळपास-------------------- वर्षापूर्वीचे हे दोन अनुभव मला आजही खूप महत्वाचे वाटतात. ( ५० , १००, २५ )

३. तैसा धावे माझिया काजा | अंकिला मी -------------------- तुझा ||

( मालक , नोकर , दास )

४. किती प्रचंड -------------------- चिकटलेला असतो, आपल्या पायाना!

( कार्बन , ऑक्सिजन , नायट्रोजन )

५. एवढा मोठा अपघात त्याच्या ------------------------------ टळला म्हणून निरंजनचे कौतुक झाले. ( चतुराईमुळे , चाणाक्षपणामुळे , हुशारीमुळे )

६. ------------------------------ तर फार गडबडून गेल्या.

( सखुमावशी , रेखामवशी , आजीबाई )

**प्रश्न ४.(ब). खालील दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा :** **गुण ४**

( योजना , कठीण , स्वभाव , ताबोडतोब , सुंदर, सराव , उपजीविका , पारदर्शक )

१. प्रवृत्ती : ------------------------------ २. गोजिरा : ------------------------------

३. अभ्यास : ---------------------------------------------- ४. स्फटिक : ----------------------------------------------

५. उदरनिर्वाह : ---------------------------------------------- ६. नियोजन : ----------------------------------------------

७. तत्काळ : ---------------------------------------------- ८. अवघड : ----------------------------------------------

**प्रश्न ४. (क). वाक्प्रचार व अर्थ लिहा :** **गुण ५**

**( कारस्थान रचणे,विनंती करणे, प्राण गमावणे, झुंज देणे, आपलेपणा असणे,योजना करणे)**

१. संघर्ष करणे : ----------------------------------------------

२. आपुलकी असणे : ----------------------------------------------

३. आर्जव करणे : ----------------------------------------------

४. जीवाला मुकणे : ----------------------------------------------

५. कट रचणे : ----------------------------------------------

**----------------- The End -------------------**